**ठळक बातम्या**

- नागपूर जिल्ह्यात कारखान्यातल्या स्फोटात १७ जणांचा मृत्यू, तर अन्य १८ जण जखमी / मुख्यमंत्र्यांनी दिले चौकशीचे आदेश, मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर

- चालू हंगामात विक्रमी साखर उत्पादन करून महाराष्ट्र उत्तरप्रदेशाला मागे टाकेल असा भारतीय साखर आणि जैव ऊर्जा उत्पादक संघटनेचा अंदाज

- इराणवर इस्त्राएल आणि अमेरिकेच्या हल्ल्यानंतर पश्चिम आशिया क्षेत्रात संघर्ष पेटला/ जगभरात पडसाद

- पश्चिम आशियातल्या भारतीयांसाठी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचना जारी

**आणि**

- टी - ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना वेस्ट इंडीजबरोबर

**<><><><><>**

नागपूर जिल्ह्यात काटोलजवळ राऊळगाव इथं आज सकाळी एका कारखान्यात झालेल्या स्फोटात १७ जणांचा मृत्यू झाला, तर १८ जण जखमी झाले. खाणकाम आणि औद्योगिक वापरासाठी स्फोटकं तयार करणाऱ्या कारखान्यात हा स्फोट झाल्याचं स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरु असून, एनडीआरएफ आणि एसडीआरएफ चं पथक मदतकार्य करत असल्याचं जिल्हाधिकारी बिपिन इटनकर यांनी सांगितलं.

- **- - होल्ड- बाईट- जिल्हाधिकारी- - -**

या दुर्घटनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त केलं असून, मृतांच्या वारसाला राज्यशासनातर्फे ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. मृतांची ओळख पटवण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांची डीएनए टेस्ट केली जाईल.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबाला प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून २ लाख रुपयांची , तर जखमींना

प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत दिली जाईल असं त्यांनी समाज मध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

<><><><><>

चालू हंगामात विक्रमी साखर उत्पादन करून महाराष्ट्र उत्तरप्रदेशाला मागे टाकेल असा अंदाज भारतीय साखर आणि जैव ऊर्जा उत्पादक संघटनेनं वर्तवला आहे. देशातलं एकूण साखर उत्पादन ३ कोटी २० लाख टनापेक्षा जास्त होण्याचा अंदाज आहे. यात महाराष्ट्राचा वाटा एक कोटी दहा लाख टनापेक्षा जास्त तर उत्तरप्रदेशाचा वाटा जवळपास एक कोटी टन इतका राहील. गेल्या हंगामात महाराष्ट्राने ९० लाख टन साखर उत्पादन केलं होतं तर उत्तरप्रदेशाचं साखर उत्पादन एक कोटी टन इतकं होतं.

<><><><><>

मुंबई-विजयदुर्ग दरम्यानची रो-रो सेवा आजपासून सुरु झाली. आठवड्यात दोन दिवस ही सेवा उपलब्ध राहील. त्यानुसार दर बुधवार आणि शनिवारी मुंबईत भाऊचा धक्का इथून विजयदुर्गसाठी रो-रो बोट रवाना होईल, तर गुरुवार आणि रविवार या दिवशी विजयदुर्ग इथून ती मुंबईत येईल. या सेवेमुळे मुंबई-विजयदुर्ग दरम्यानचा प्रवासाचा वेळ निम्म्यावर येणार असून, कोणवासीयांना त्याचा लाभ मिळेल. रो-रो बोटीतून आपल्या वाहनांसकट प्रवास करता येईल. त्यामुळे इंधनाचा आणि टोलचा खर्च वाचेल, तसंच कोकणातल्या पर्यटनाला चालना मिळेल अशी अपेक्षा वर्तवली जात आहे.

<><><><><>

व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात २८ ते ३१ रुपयांची वाढ झाली आहे. यानुसार १९ किलो वजनाचा सिलिंडर दिल्लीत १ हजार ७६८ रुपयांना मिळेल तर मुंबईत १ हजार ७२० रुपयांना मिळेल. नवे दर आजपासून लागू झाले आहेत . घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरच्या दरात कोणतीही वाढ झाली नाही.

<><><><><>

पुद्दुचेरी इथं दोन हजार सातशे कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. शाळा, रुग्णालय, रस्ते अशा पायाभूत सुविधांना सरकारने प्राधान्य दिल्याने लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडत आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**- - होल्ड बाईट मोदी - -**

यावेळी प्रधानमंत्र्यांनी पुद्दुचेरीत झालेल्या विविध विकासकामांचा आढावा आपल्या भाषणात घेतला.

तमिळनाडू इथं चार हजार चारशे कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज करणार आहेत.

**<><><><>**

गुरू तेग बहादुर यांच्या साडेतीनशेव्या शहीद दिनानिमित्त आयोजित हिंद-दी-चादर या कार्यक्रमाला नवी मुंबईत खारघर इथे ओवे मैदानात सुरुवात झाली. दोन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमाला १५ लाखांहून अधिक भाविक येण्याची शक्यता आहे. भाविकांसाठी लंगर, वाहनतळ, आरोग्य शिबिरांची व्यवस्था करण्यात आली आहे. या कार्यक्रमात शीख समुदायाच्या दर्शन घडवणारे विरासत ए सीख हे प्रदर्शन उभारण्यात आलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज संध्याकाळी या कार्यक्रमात उपस्थित राहणार असून ते सभेला संबोधित करतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर मंत्री, आमदारही या कार्यक्रमाला उपस्थित राहतील.

**<><><><>**

अमेरिका आणि इस्रायलनं काल केलेल्या हवाई हल्ल्यात इराणचे नेते अयातुल्ला अली खामेनी ठार झाल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषित केलं आहे. इराणच्या सरकारी वृत्तसंस्थेनं आज त्याला दुजोरा दिला. या हल्ल्यात इराणचे लष्करप्रमुख आणि संरक्षण मंत्री देखील ठार झाल्याचं वृत्त आहे. या हल्ल्यात इराणचे ४० पेक्षा जास्त सरकारी अधिकारी मारले गेले, किमान २०१ नागरिकांचा मृत्यू झाला, तर ७०० पेक्षा जास्त नागरिक जखमी झाले.

हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी इराणनं संपूर्ण मध्यपूर्वेत हल्ले सुरु केले आहेत. दुबई, दोहा, बहरीन आणि कुवेत मध्ये अमेरिकेचे लष्करी तळ असलेल्या किंवा अमेरिकेशी संबंधित ठिकाणी इराणने हल्ले केल्याचं वृत्त आहे. इराणनं आपले नेते अयातुल्ला खमेनी यांच्या हत्येचा बदला घेण्याची प्रतिज्ञा केल्याच्या पार्श्वभूमीवर, इराणवरचे हल्ले आणखी तीव्र केले जातील, असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे.

संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अंतेनियो गुटेरस यांनी या हल्ल्यांचा तीव्र निषेध केला असून दोन्ही पक्षांनी ताबडतोब शस्त्र खाली ठेवून वाटाघाटी सुरु कराव्या असं आवाहन सुरक्षा परिषदेच्या तातडीनं बोलावलेल्या बैठकीत केलं. हा हल्ला मानवतेविरुद्धचा गुन्हा असून इराणमधे नरसंहार झाला आहे, असं इराणच्या प्रतिनिधींनी सांगितलं. इराणमध्ये ४० दिवसांचा दुखवटा जाहीर झाला आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या प्रतिनिधींनी मात्र या कारवाईचं समर्थन केलं. जगभरात या संघर्षाचे पडसाद उमटत आहेत. चीनने या घडामोडींबद्दल  तीव्र चिंता व्यक्त केली असून तात्काळ युद्ध थांबवण्याचं आवाहन केलं आहे. अमेरिकेच्या माजी उपाध्यक्ष कमला हॅरिस यांनी या हल्ल्यांवर तीव्र टीका केली आहे.

भारतातही अनेक ठिकाणी या हल्ल्याचा निषेध केला जात आहे.  कालचा हल्ला विनाकारण आणि संहारक ठरला असून केंद्र सरकारनं या परिसरात शांतता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घ्यावा असं आवाहन काँग्रेस प्रवक्ता शमा मोहम्मद यांनी केलं आहे.

या युद्धाच्या तणावामुळे दुबई विमानतळावरची उड्डाणं अनिश्चित काळासाठी स्थगित केली आहेत. या विमानतळाबाहेर काही तासांपूर्वी स्फोट झाला होता. या वेळी दुबई विमानतळावर अडकलेली भारताची बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधू हिला सुरक्षित स्थानी हलवलं आहे. पुण्यातल्या Indira School of Business Studies चे ८४ विद्यार्थी या विमानतळावर अडकून पडले असल्याचं वृत्त आहे.

पश्चिम आशियात पेटलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं तिथल्या भारतीयांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. भारतीय दूतावास रात्रंदिवस मदतीसाठी उपलब्ध असतील असं त्यात म्हटलं आहे. तसंच भारतात तात्पुरत्या वास्तव्यासाठी आलेल्या परदेशी नागरिकांसाठीही परराष्ट्र मंत्रालयानं मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. ज्या नागरिकांना व्हिसाची मुदत वाढवून हवी आहे, अथवा आपलं वास्तव्य नियमित करून हवं आहे, त्यांनी आपल्या जवळच्या परदेशी नागरिक नोंदणी कार्यालयाशी संपर्क साधावा, असं यात म्हटलं आहे.

या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर CBSE नं पश्चिम आशिया विभागातल्या उद्याच्या इयत्ता १० वी आणि १२ वीच्या परीक्षा पुढं ढकलल्या आहेत. नव्या तारखा लवकरच झाहीर केल्या जातील. मंगळवारी परिस्थितीचा आढावा घेऊन पुढच्या वेळापत्रकाबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल, असं CBSE नं म्हटलं आहे.

<><><><><>

विश्वचषकाच्या सुपर एट सामन्यात भारताचा सामना आज वेस्टइंडिज संघाविरुद्ध कोलकात्यातील ईडन गार्डन्स इथं होणार आहे. उपांत्य फेरीत स्थान मिळवण्यासाठी भारताला हा सामना जिंकणं अत्यावश्यक आहे. सायंकाळी सात वाजता सामना सुरु होईल. वेस्ट इंडिज सध्या गुणतालिकेत सरस धावगतीच्या जोरावर दुसऱ्या स्थानावर आहे. उपांत्य लढती जिंकणाऱ्या संघांतील विश्वचषक विजेतेपदाची लढत येत्या आठ मार्चला रविवारी अहमदाबाद इथं होणार आहे.

<><><><><>

उद्या फाल्गुन पौर्णिमा म्हणजेच होळी पौर्णिमा. मनातल्या वाईट विचारांचा जाळून नाश करण्यासाठीचा प्रतिकात्मक सण म्हणून होळी साजरी केली जाते. होळीच्या दुसऱ्या दिवशी धूलिवंदन आणि पाचव्या दिवशी रंगपंचमी साजरी करतात. होळीचा सण साजरा करताना झाडं न तोडण्याचं तसंच, वायू प्रदूषण टाळण्याचं आणि पाण्याचा वापर कमी करण्याचं आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलं आहे.

//<><><><><>//